MHRG070002292026

**<u>फौजदारी चौकशी अर्ज क्र.२८/२०२६ मधील निशाणी क्र. १ वरील आदेश</u>**

सदर अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम ५०३ अन्वये अर्जदार श्री.प्रभाकर रमेश वायले, राहणार – वसार, ता. अंबरनाथ, जि. ठाणे राज्य उत्पादन शुल्क, कर्जत विभाग येथील दाखल गुन्हा नोंद क्र. १३/२०२६ मधील महिंद्रा कंपनीची बोलारो पिकअप ही चारचाकी गाडी नोंदणी क्र. MH-05EL1714 चेसीस क्र.MA1ZN2TNKM1D35845 चा ताबा मिळणेसाठी केलेला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, सदरील चारचाकी वाहनाचा या गुन्हयाशी काहीही संबंध नाही. सदरचे चारचाकी वाहन हे अर्जदाराच्या एकट्याच्या मालकीचे आहे. सदरचे चारचाकी वाहन राज्य उत्पादन शुल्क, कर्जत पोलीस स्टेशनच्या आवारात उन्हात उभे असून ते वाहन व्यवस्थित ठेवण्यासाठी यंत्रणा पनवेल पोलीसांकडे नाही. सदरील चारचाकी वाहन हे अर्जदाराच्या नित्याच्या वापराचे असल्याने त्याचा ताबा अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. सदरील वाहन हे बंद अवस्थेत बराच काळ पडून राहिल्यास, अर्जदाराचे बरेच नुकसान होणार आहे. सदरील वाहनाच्या स्वरुपामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल न करण्याची हमी अर्जदार घेत आहे. सदरील वाहन मा. न्यायालयाच्या परवानगीशिवाय कोणासही कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत न करण्याची हमी अर्जदार घेत आहे. चौकशीचे काम व संपरीक्षाचे कामी ज्या ज्या वेळेस सदरील वाहनाची गरज भासेल त्या त्या वेळेस ती हजर करण्याची हमी अर्जदार घेत आहे. आवश्यक त्या रकमेचा

बॉड देण्यास सदरील अर्जदार तयार आहे. सबब अर्जदार यांचे मालकीचे सदरील वाहन राज्य उत्पादन शुल्क, कर्जत पोलीस स्टेशन यांस परत देण्याचा हुकूम करण्यात यावा. इतर योग्य व न्यायाचे हुकूम अर्जदारांच्या लाभत व्हावेत.

०३. सहा. सरकारी अभियोक्ता आणि तपासी अंमलदार यांचे म्हणणे मागविले. सरकारी अभियोक्ता यांनी असे कथन केले आहे की, सदर प्रकरणामध्ये जप्त करण्यात वाहन हे महत्वाचा पुरावा असून सदर गुन्हाचा तपास प्रलंबीत आहे. सदरचे वाहन हे अवैधरित्या हातभट्टीच्या गावठी दारुची वाहतूक करीत असतांना आरोपीचे ताब्यातून जप्त करण्यात आलेले आहे. सदरचे वाहन हे अर्जदारास परत केल्यास त्यामध्ये फेरबदल अथवा ते विक्री करण्याची अथवा अश्याच प्रकारच्या गुन्हांमध्ये वापरण्याची शक्यता आहे. सबब सदरचा अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा ही विनंती. तपासी अंमलदार यांनी असे कथन केले आहे की,सदरचे चारचाकी वाहन अर्जदारास परत केल्यास त्या चारचाकी वाहनाचा वापर पुन्हा अवैधरित्या हातभट्टीच्या गावठी दारुच्या वाहतूकीसाठी केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सदरचे चारचाकी वाहन अर्जदारास परत देवू नये, असे त्यांच्या कार्यालयाचे म्हणणे आहे.

०४. मी दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी त्यांच्या आधार कार्डची प्रमाणित प्रत, वर नमुद गाडीच्या आर.सी. बुकची प्रमाणित प्रत व अर्जदार यांच्या गाडीचे इन्शुरंन्सची प्रत इत्यादी सदरची कागदपत्रे पडताळुन पाहिली असता सदरचे वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदरचे वाहन हे राज्य उत्पादन शुल्क, कर्जत पोलीस स्टेशन, यांचे कार्यालयात ठेवुन दिल्यास कोणताही उद्देश साध्य होणार

नाही. सबब, सदर जप्त मुद्देमाल अर्जदारास परत देणे मला उचित वाटते. करिता निम्नलिखित आदेश.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | कर्जत पोलीस स्टेशन येथील दाखल गुन्हा नोंद क्र.१३/२०२६ मधील महिंद्रा कंपनीची बोलारो पिकअप ही चारचाकी गाडी नोंदणी क्र. MH-05EL1714 चेसीस क्र.MA1ZN2TNKM1D35845 अर्जदार श्री. श्री.प्रभाकर रमेश वायले यांना रक्कम रुपये ३,००,०००/–(अक्षरी रक्कम रुपये तीन लाख) रुपयांच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर अंतरिम स्वरुपात द्यावा. |
| ३. | जप्त चारचाकी गाडी ही अर्जदाराची नसल्याचे निष्पन्न झाल्यास सदर गाडीची किंमत अगर गाडी अर्जदार यांनी परत करावी. |
| ४. | अर्जदाराने चारचाकी गाडी ही निर्देशित तारखेस न्यायालयात हजर ठेवावा. तसेच चारचाकी गाडी ही गहाण, दान, विक्री, त्याचे स्वरुपात कोणताही बदल न करणे, कोणासही हस्तांतरण न करणे व नष्ट न करणे. |
| ५. | दुय्यम निरीक्षक यांनी अर्जदारास सदरची चारचाकी गाडी देण्यापुर्वी त्याचे छायाचित्र अर्जदाराच्या खर्चाने काढुन त्याचा सविस्तर पंचनामा तयार करावा व गुन्हयाच्या दोषारोपत्रात त्याचा समावेश करावा. |
| ६. | अर्जदाराने सदर चारचाकी गाडीचा वापर कोणत्याही अवैध कारणासाठी करु नये तसेच सदर चारचाकी गाडी अवैध कोणासही वापरण्यास देऊ नये. |
| ७. | सदर आदेशाची प्रत राज्य उत्पादन शुल्क,कर्जत पोलीस स्टेशन |

| | |
|---|---|
| | यांच्याकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी. |

Sd/-

कर्जत
(श्रीमती ए. एस. वाडकर)
दिनांक : ११/०३/२०२६
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.
जि. रायगड